# ॥ रानात एकटेच पडलेले फूल ॥

वन सर्व सुगंधित झाले
मन माझे मोहुन गेले
                    कितितरी ॥धृ॥

मी सारे वन हुडकीले
फुल कोठे नकळे फुलले
                    मज तरी

स्वर्गात्स्
  दिव्य वृक्षास्स्
    बहर्स् ये खास्स्

असे कल्पीले, असे कल्पीले
मन माझे मोहुन गेले
                    कितितरी ॥१॥

परि फिरता फिरता दिसले
फुल दगडाआड लपाले
                लहानसे

दिसण्यात
  फार ते साधे
    परी आमोदे

जगामधि पहिले, जगामधि पहिले
मन माझे मोहुन गेले
                    कितितरी ॥२॥

मी प्रेमे वदलो त्याशी
का येथे दडुनी बसशी
                  प्रिय फुला

तू गडे
  फुलांची राणी
    तुला गे कोणी

रानी धाडीले, रानी धाडीले
मन माझे मोहुन गेले
                    कितितरी ॥३॥

ते लाजत लाजत सुमन
मग म्हणे थोडके हसुन
                    यापरी

निवडिले
  प्रभूने स्थान
    रम्य उद्यान

तेच मज जाले, तेच मज जाले
मन माझे मोहुन गेले
                    कितितरी ॥४॥

कवि रे. ना. वा. टिळक

परवा सहज पडल्या पडल्या लहानपणी वाचलेली एक कविता आठवली. रे. ना. वा. टिळकांनी ती लिहिली आहे. ही कविता आम्हाला पहिली ते अकरावी या दरम्यान जवळ जवळ चार निरनिराळ्या वेळेला अभ्यासाला होती. गंमत अशी की वेगवेगळ्या वयात या कवितेचा वेगवेगळा अर्थ जाणवतो.

अगदी लहानपणी वाटते, परमेश्वर सर्वात श्रेष्ठ त्याने केले त्यात बदल करण्याची आवश्यकता नाही ऽ असा अर्थ वाटतो।

तरूणपणी रानातल्या सुंदर मुलीवर लुब्ध झालेला शहरी प्रियकर भासतो.

आता प्रौढपणी काय वाटते ? आडगावातल्या कलाकाराला / कुशल्
कारागीराला स्पॉन्सर करून फायदा करू पहाणारा व्यावसायिक वाटतो ?

बघा तुम्हाला काय वाटते ही कविता वाचून ते ---

Mahesh.Velankar@mci.com

---

Please send corrections to sanskrit@cheerful.com
Last updated October 4, 1999